**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानपरिषदेच्या ४ जागांसाठी येत्या १० जूनला मतदान
- लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यासाठीचा प्रचार शिगेला / विरोधक अफवा पसरवत असून कोणत्याही प्रकारे संविधान बदललं जाणार नाही, अशी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांची स्पष्टोक्ती
- केंद्रातल्या मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची शरद पवार यांची टीका

**आणि**

- औरंगाबादचं नामांतर छत्रपती संभाजीनगर, आणि उस्मानाबादचे नामांतर धाराशिव करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळल्या

**<><><><><>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं महाराष्ट्र विधानपरिषदेच्या २ पदवीधर आणि २ शिक्षक मतदारसंघातल्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम आज जाहीर केला. त्यानुसार मुंबई आणि कोकण विभागीय पदवीधर मतदारसंघांमध्ये तर नाशिक विभागीय आणि मुंबई शिक्षक मतदारसंघांमध्ये येत्या १० जूनला मतदान होईल. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी २२ मे पर्यंत मुदत असून २४ तारखेला छाननी होईल. २७ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील तर १३ जूनला मतमोजणी होईल.

या मतदारसंघांमधले विलास पोतनीस, निरंजन  डावखरे, किशोर दराडे आणि कपिल पाटील असे चार विद्यमान सदस्य ७ जुलैला निवृत्त होत असल्यानं ही निवडणूक होणार आहे.

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्याच्या मतदानाला अवघे पाच दिवस शिल्लक असल्यानं प्रचार शिगेला पोहोचला आहे. सर्वच राजकीय पक्षांचे स्टार प्रचारक सभा, बैठका, रोड शो, पदयात्रा आदींच्या माध्यमातून प्रचार करत आहेत. चौथ्या टप्प्यात राज्यातल्या औरंगाबाद, जालना, बीड, नंदुरबार, जळगाव, रावेर, मावळ, पुणे, शिरूर, अहमदनगर आणि शिर्डी या मतदारसंघांमध्ये, येत्या १३ मे रोजी मतदान होणार आहे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज जालना इथं महायुतीचे उमेदवार रावसाहेब दानवे यांच्या प्रचारार्थ सभा होत आहेत.

**<><><><><>**

देशात भाजपाची सत्ता आली तर संविधान बदललं जाईल अशी अफवा विरोधक पसरवत आहेत, प्रत्यक्षात अशा कोणत्याही प्रकारे संविधान बदललं जाणार नाही असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज नाशिकमधे शिवसेना उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात बोलत होते. या निवडणूकीच्या निमित्तानं अल्पसंख्याकांची दिशाभूल केली जात आहे मात्र मुस्लिम समाजाला अडचण आली तरी शिवसैनिक जाऊन मदत करतील, हे सर्वसामान्यांचं सरकार असल्याने ते कायम सामान्यांसाठी धावून येईल, असं ते म्हणाले.

यावेळी शिवसेमा उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षातून शिवसेनेत दाखल झालेले विजय करंजकर यांच्या समर्थक असलेल्या, भगूर नगरपालिका आणि नाशिक महापालिकेच्या माजी नगरसेवकांनी, तसंच नाशिक जिल्हा परिषदेच्या माजी सदस्यांनी शिंदे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला.

शिर्डी लोकसभा मतदारसंघातले महायुतीचे उमेदवार सदाशिव लोखंडे यांच्या प्रचारासाठी एकनाथ शिंदे यांनी आज संगमनेरमधे सभा घेतली. घाट माथ्यावरचं समुद्राकडे वाहून जाणारं पाणी अडवून नाशिक आणि मराठवाड्याला देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचं त्यांनी या सभेत सांगितलं.

**<><><><>**

ही लोकसभा निवडणूक सामान्य माणसांच्या आशा, अपेक्षा कोण पुर्ण करु शकते, याचा फैसला करणारी असल्याचं उपमुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी म्हटलं आहे. ते आज धुळे लोकसभा मतदार संघात भाजपाच्या उमेदवार डॉ हिना गावित यांच्या प्रचारासाठी शिरपूर इथं आयोजित विजय संकल्प मेळाव्यात बोलत होते.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या काळात देशातल्या सर्वच घटकांसाठी कल्याणकारी योजना राबवल्या जात असून 'सबका साथ, सबका विकास' साधला जात आहे. त्यामुळे विरोधकांकडे मुद्देच उरलेले नाहीत. म्हणून त्यांनी 'मोदी यांना ४०० जागा मिळाल्या तर ते संविधान बदलतील' असा खोटा प्रचार सुरु केला आहे. परंतु, मोदी यांच्यासाठी धर्मग्रंथांपेक्षा संविधान श्रेष्ठ आहे. चंद्र-सूर्य असेपर्यंत ते संविधान बदलणार नाहीत. उलट काँग्रेसनं इंदिरा गांधी यांच्या काळात दोन वर्षे आणीबाणी जाहीर करुन संविधान गुंडाळून ठेवलं होतं. त्याचा जाब विरोधकांनी द्यावा, असं ते म्हणाले.

**<><><><>**

केंद्रातल्या मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका शरद पवार यांनी केली आहे. ते आज अहमदनगर जिल्ह्यात श्रीगोंदा इथं राष्ट्रवादी काँग्रेस शरद्चंद्र पवार पक्षाचे उमेदवार निलेश लंके यांच्या प्रचार सभेत बोलत होते. शेतकऱ्यांच्या उत्पादित साखरेला निर्यात बंदी आहे, कांद्याला निर्यात बंदी केली

जाते, गरीब शेतकऱ्यांची ही पिकं असून त्याला भाव न मिळणं हे शेतकऱ्यांच्या हिताचं नाही, असं ते म्हणाले.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, खासदार संजय राऊत, आमदार रोहित पवार, माजी आमदार राहुल जगताप उपस्थित होते.

**<><><><><>**

धुळे आणि नंदुरबार दोन्ही लोकसभा मतदार संघात भारतीय जनता पक्षाबद्दल प्रचंड रोष आहे. त्यामुळे यंदा धुळे, नंदूरबारमध्ये भाजपचा दारुण पराभव होईल, असा दावा काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी  केला आहे. ते आज धुळ्यात वार्ताहर परिषदेत बोलत होते.

**<><><><><>**

श्रोतेहो, ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ या कार्यक्रमात आजच्या भागात आपण ‘**दिंडोरी आणि नाशिक**’ लोकसभा मतदार संघांचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

**<><><><><>**

औरंगाबादचं नामांतर छत्रपती संभाजीनगर, आणि उस्मानाबादचे नामांतर धाराशिव करण्याच्या सरकारच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळल्या आहेत. मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती देवेंद्र उपाध्याय आणि न्यायमूर्ती अरीफ डॉक्टर यांनी आज यावर निर्णय दिला. सरकारच्या या निर्णयात बेकायदेशीर असं काही **न**सल्याचं त्यांनी सांगितलं. त्याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी समाधान व्यक्त केलं आहे. हा जनभावनेचा विजय असून, आज

बाळासाहेब ठाकरे यांच स्वप्न खऱ्या अर्थानं पूर्ण झालं, अशी प्रतिक्रिया त्यांनी व्यक्त केली आहे.

<><><><><>

भारतासारख्या लोकशाही अस्तित्वात असलेल्या देशाची निवडणूक प्रक्रिया महत्वाची असून मतदान प्रक्रियेसाठी निवडणूक आयोगानं उत्कृष्ठ नियोजन केल्याचं मत निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी आलेल्या परदेशी शिष्टमंडळाच्या प्रतिनिधींनी आज व्यक्त केलं आहे. भारत निवडणूक आयोगानं इतर देशांच्या निवडणूक व्यवस्थापन संस्थांबरोबर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सहभागासाठी कार्यक्रम आयोजित केला. त्या अंतर्गत रायगड इथल्या मतदान केंद्रावरील मतदान प्रक्रियेची या शिष्टमंडळानं पाहणी केली.
त्यानंतर या शिष्टमंडळाने राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस.चोक्कलिंगम यांची भेट घेऊन भारतातील निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती जाणून घेतली. या शिष्टमंडळात बांगलादेश, श्रीलंका, कझाकिस्तान आणि झिम्बाबाब्वे या देशातल्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

<><><><><>

पंजाब नॅशनल बँक घोटाळा प्रकरणातील प्रमुख फरार आरोपी नीरव मोदी याचा जामीन अर्ज ब्रिटनच्या न्यायालयाने फेटाळला आहे. जामीन दिल्यास आरोपी न्यायाच्या कचाट्यातून सुटून पुन्हा पळून जाण्याचा मोठा धोका असल्याचं न्यायालयानं जामीन अर्ज फेटाळताना नमूद केलं आहे. गेल्या पाच वर्षांपासून लंडनच्या तुरुंगात असलेल्या नीरव मोदीनं काल नव्याने जामीन मिळण्यासाठी अर्ज केला होता. या सुनावणीसाठी भारतातून केंद्रीय अन्वेषण विभाग अर्थात सीबीआय

आणि सक्तवसुली संचालनालय अर्थात ईडीचं संयुक्त पथक ब्रिटनला रवाना झालं होतं.

<><><><>

रशियन सैन्यात नोकरी मिळवून देण्याचं आमिष दाखवून भारतीय नागरिकांची तस्करी करण्याचा प्रयत्न करणाऱ्या दोघा जणांना सी बी आयनं मुंबईतून अटक केली आहे. देशभरातल्या निरागस युवकांना विदेशातल्या आकर्षक नोकऱ्या मिळवून देण्याचं आमिष दाखवणारं एक मोठं रॅकेट उद्ध्वस्त केल्याचं सीबीआयनं म्हटलं आहे. भारतीय युवकांना सैन्य प्रशिक्षण देऊन त्यांच्या इच्छेविरुद्ध रशिया-युक्रेन युद्धात आघाडीवर पाठवलं जात असे.

<><><><>

हिंगोली जिल्ह्यात सेनगाव इथल्या नाफेड खरेदी केंद्राच्या अधिकाऱ्याने १३ लाख रुपयांचा गैरव्यवहार केल्याबद्दल पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे. सेनगाव इथल्या स्मृती शेतकरी उत्पादक केंद्रामार्फत नाफेड ची खरेदी केली जात होती. या केंद्राचा प्रमुख कार्यकारी अधिकारी सुरज मोरे याने ११ शेतकऱ्यांनी केंद्रावर आणलेला २३२ क्विंटल हरभरा परस्पर खुल्या बाजारात विकल्याचा आरोप त्याच्यावर आहे. केंद्रावर दिलेल्या हरभऱ्याचा मोबदला बँक खात्यात न आल्यामुळे शेतकऱ्यांनी नाफेड कडे विचारणा केली असता हा प्रकार उघडकीला आला.

<><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैदराबाद आणि लखनौ सुपर जायंट्स यांच्यात सामना होणार आहे. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

लखनौ सुपर जायंट्सनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

विदर्भात काल गोंदिया, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, तसंच भंडारा जिल्ह्यांच्या अनेक भागात गारपिटीसह अवकाळी पाऊस झाला.

येत्या दोन दिवसात मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामानशास्त्र विभागाने वर्तवली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असून कोकणात हवामान कोरडं राहील असं हवामानशास्त्र विभागाच्या पत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**